INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**October-November-December-2018**

**Vol. 5 Issue 4**

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**This Journal is indexed in :**
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
UGC Approved Journal
October-November-December 2018
ISSN : 2348-7143
Vol. 5, Issue 4

# आधुनिक महाराष्ट्रातील शिक्षणाच्या बहुजनीकरणात महात्मा फुले यांची भूमिका

प्रा. वटाणे कल्याण राजेंद्र
दादा पाटील महाविद्यालय,
कर्जत, जिल्हा—अहमदनगर
मो.नं. ९८६०११६१७६
ईमेल— kallyanwatane@gmail.com

प्रा. भैलुमे एच. पी.
दादा पाटील महाविद्यालय,
कर्जत,जिल्हा—अहमदनगर
मो.नं. ९४२३५३१४४५
ईमेल—harishbhailume@gmail.com

प्रस्तावना :

'इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्टता दोहोंचा वेध असतो. त्यामधील अनेकदा दुर्लक्षित राहणारा विशिष्टतेचा अंग प्रादेशिक इतिहासामुळे उजेडात येत असतात.[१] इतिहास अभ्यासाची चौकट विस्तारली असून संशोधक मनुष्य जीवनाच्या विविध आयामाचा अभ्यास वेगवेगळया पातळीवर करू लागले आहेत. 'शिक्षण' हा एक महत्वाचा पैलू मानवी जीवनात मानला जातो.

व्यक्तीचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि नैतिक विकास करून मनुष्याला समाजाची उन्नती करण्याच्या योग्य बनविण्याचे काम शिक्षण करत असते. म्हणूनच शिक्षण फार महत्वाचे आहे.[२] 'अतं:दीप भव' म्हणजे स्वयंप्रकाशित व्हा असे इ.स.पू. ६ व्या शतकामध्ये गौतम बुद्धांनी त्रिपिठकात सांगितले. मनुष्य आणि शिक्षण यांच्यासारख्याच मानव व समाजाचाही खूप जवळचा संबंध आहे. म्हणजे समाजनिर्मितीचा शिक्षण एक भाग बनतो. समाज हा विविध अंगानी आणि उपव्यवस्थेतून घडलेला असतो. कुटुंबव्यवस्था, राज्यव्यवस्था, शासनव्यवस्था आणि शिक्षणव्यवस्था आदी उपव्यवस्था समाजमध्ये असातात.[३] शिक्षणामुळे प्रतिगामी आणि सनातनी मनाचा लोकांच्या मनावर जो पगडा पडला आहे तो दूर होईल. तसे झाल्याशिवाय समाजाची प्रगती नाही. बाळशास्त्री जांभेकर म्हणतात. ''विद्या मनुष्यमात्रास उपयोगी आहे. विदयेपासून कीर्ती व द्रव्य यांचा लाभ होतो. विदयेमुळे पुरूषाचा बहुमान होतो. विद्या श्रीमंतास भूषण, गरिबास पोटाचे साधन, तरूणाचा उत्तम उद्योग वृद्धास विश्रांती आणि सर्वास मोक्षप्राप्तींचा उपाय आहे.''[४] 'शिक्षणास मनुष्याचा तिसरा डोळा' हे महात्मा फुलेंचे उद्गार अर्थपूर्ण आहेत. शिक्षणापासून दूर झालेया समाजाची अवस्था हीन दर्जास जाऊन पोहचते. या समाजाची परिस्थिती बदलण्याकरिता त्यांच्यामध्ये शिक्षण प्रसार करणे महत्वाचे ठरते. समाजाची प्रगतीसाठी समाजसुधारक शिक्षण हा मुख्य धागा मानतात. लोकहीतवादीच्या मते, 'शिक्षणामुळे मानवाला प्रतिष्ठा व पैसा प्राप्त होतो.' गो.ग.आगरकर 'विदयेला एक प्रकारचे धन' मानवात.[५] 'सर्व प्रकारच्या प्रगतीचा पाया शिक्षण आहे.' असे जगन्नाथ शंकरसेठ शिक्षणाचे यथार्थ वर्णन करतात. डॉ.भाऊ दाजी लाड यांच्या शैक्षणिक चळवळीचा मुख्य हेतू 'शिक्षणातून सामाजिक जाण' हा दिसतो.[६] तर शिक्षणाचे महत्व संघटीत होऊन संघर्षासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जे आधोरेखीत केले ते उल्लेखनिय आहे.'

भारतीय शिक्षणाच्या बहुजनी कारणासंदर्भात काही व्यक्ती आणि संस्थेचे इतके मोठे योगदान लाभले आहे की, त्याचे महान कार्य घडले नसते तर भारतीय बहुजन समाज आज शिक्षणाच्या प्रवाहामध्ये जितक्या जोमाने गतिशील झाला आहे. तसा तो झाला नसता भारतीय शिक्षणाच्या बहुजनी करणात महात्मा फुले यांचे कार्य मोलाचे आहे. फुले यांनी १९व्या शतकात ज्ञानगंगेचा प्रवाह जनसामान्यपर्यंत पोहचविण्याचे बहुमोल कार्य केले होते व त्यासाठीआग्रही होते.



Scanned with CamScanner

महात्मा फुले हे आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाज परिवर्तनाच्या चळवळीचे आद्यप्रवर्तक होते. त्या काळात पोटापुरती शेतकऱ्याकडे जमीन असल्यास उपजीवकेकरिता शिक्षणाची निकड भासत नव्हती. लहान शेतकरी शेतमजूर इतके गरीब होते. की शिक्षण घेणे त्यांच्या आवाक्या बाहेरचे होते. तसेच शिकुन काय करायचे अशी भावना बहुजन समाजामध्ये होती. शिक्षणाची ताकद ओळखण्याचे द्रष्टेपण महाराष्ट्रामध्ये बहुजन समाजात महात्मा फुले यांचे जवळ होते.[७] फुले यांनी आपल्या कार्याने, वाणीने व लेखणीने सनातन्यांच्यावरती घणाघाती प्रहार केला. म्हणुनच बहुजन समाजाच्या दुःखाची कारणमीमांसा सांगताना 'शेतकऱ्यांचा आसूड' या पुस्तकाच्या सुरूवातीस ते म्हणतात " विद्येविना मती गेली, मतीविना निती गेली, नितीविना गती गेली, गतिविना वित्त गेले, वित्त विना शुद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले" ते अगदी यथार्थ होते. या अविद्येच्या गर्तेतून ब्राम्हणेत्तर यांना बाहेर काढण्याचे कार्य त्यांनी आपले जिवीत कार्य म्हणून अवलंबिले. फुले यांनी आपली पत्नी (सावित्रीबाई फुले) आणि निवडक सहकार्यांच्या मदतीने महाराष्ट्रातील या दुबळया समाजाचे अज्ञान दुर करण्याचा प्रयत्न केला. पुण्यासारख्या तत्कालीन प्रतिगामी विचाराच्या पेशवाईच्या बालेकिल्ल्यात दीनदुबळया शुद्रनिशुद्रांना शिक्षण देण्याचे प्रयत्न करणे हे अत्यंत अवघड काम होते. बहुजनांना उच्चवर्णीयांच्या वर्चस्वाच्या मगरमिठीतून सोडविण्यासाठी जे पुरोगामी काम हाती घेतले होते. त्याकरीता त्यांना वडिलांचे घर सोडावे लागले होते. दारिद्रयात राहून कष्ट उपसावे लागले. तळागाळातील सामान्य माणसाची घडी बसविताना स्वतःच्या प्रपंचाची घडी विस्कटली. पण ती सुध्दा आनंदाने स्विकारली. ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी चालविलेल्या वसतिगृह शाळेत फुले यांनी काही वर्षे शिक्षकाचे काम केले.

१५ सप्टेंबर १९५३ च्या 'ज्ञानोदय' मध्ये मा. फुले म्हणतात, मी एका मित्रासोबत अहमदनगरला जावून तेथे अमेरीकन मिशन खात्यातील फरार मॅडम कन्या शाळा पाहिल्या आणि मला मोठा आनंद झाला. मग मी पुण्यात येवून लगेच एक मुलीची शाळा काढली. लहूजी मांग व राणबा महार यांनी शिकण्यापासून कसे लाभ आहेत. हे आपल्या जातबांधवांना समजावून सांगितले. व सदाशिव बल्लाव गोवंडे यांनी शाळेसाठी जागा देवून काही पाटया दिल्या आणि दोन रूपये दर महिन्याला देवू लागले. या शाळेला दरमहा २५ रूपये पुण्यातील दक्षिणेपैकी मिळतात[८] सन १८४८ हे वर्ष सर्व जगाच्या दृष्टीने एक महान क्रांतिकारक ठरले आहे. कम्युनिष्टांचा जाहिरनामा हा आपला ऐतिहासिक महत्वाचा प्रबंध याच वर्षी कार्ल्स मार्क्स याने प्रसिध्द केला. न्यूयार्क येथील वेल्सिन चर्च येथे स्त्रियांच्या उद्धाराची चळवळ या कालखंडात चालू झाली. अशाप्रकारे अमेरीकन मार्गाने वाटचाल करीत होती.[९] तसेच ब्राम्हणांच्या ऐतखावू, आळस व अज्ञान यावर प्रहार करणारी लोकहीतवादी तथा गोपाळ हरी देशमुख यांची लेखमाला (शतपत्रे) याचवेळी प्रसिध्द झाली. पुढे इ. स. १८५२ साली महार मांग जातीच्या मुलासाठी पुण्यात भोकरवाडी येथे शाळा सुरू केली. या मुलांमुलींना शिक्षण देण्याची जबाबदारी स्वतः फुले व सावित्रीबाई यांनी उचलली.

बोर्ड ऑफ एज्युकेशन सन १८५२–५३ च्या अहवालात स्वतः फुले मुलींच्या शाळेत रोज चार तास शिकवीत असत असे दिसते. शिक्षणाचे उदि्दष्ट सांगताना फुले म्हणतात. " स्वार्थावरती नजर ठेवून शोषित, पीडीत जनतेकडे पाठ फिरवून आपले पांडित्य मिरवीत असतील तर अशा शिक्षकापासून समाजाला काही लाभ होणार नाही. शिक्षणाने पदवी मिळेल. कदाचित नोकरी व सन्मानही मिळेल. परंतु ही शिक्षणाची इतिकर्तव्यता नाही. शिक्षणाची फलश्रुती सर्व समतेच्या आणि मानवी स्वातंत्र्य आणि हक्काच्या लढयाची सिध्दंता करण्यात आहे.[१०] ज्ञान हीच शक्ती आहे. म. फुले यांचे आवडते ब्रिदवाक्य होते. त्यांनी लिहीलेल्या 'तृतीय रत्न' या नाटकातील आशयाचा बारकाईने विचार केल्यास शिक्षणाविषयी त्याचे विचार शिक्षणाअभावी होणारे दुष्परीणाम, शिक्षणाची आवश्यकता आणि शिक्षणापासून मोठया प्रमाणात समाज वंचित का राहिला. या सर्व बाबींचा उहापोह या नाटकात

आहे. हे नाटक १८५५ सालातले म्हणजे सुमारे दीडशे वर्षापूर्वीचे बहुजन समाजाने शिकावे यासाठी प्रभावी प्रयत्न फुलेंनी केलेले होते.[११]

शिक्षणविषयक हंटर आयोगामुळे (१८८२) म. फुले यांनी जी साक्ष दिली. ती म्हणजे शिक्षणाचा पुरोगामी व बहुजनवादी जाहिरनामाच होता. या साक्षीतील त्याचे विचार आज ही किती प्रस्तुत आहेत प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत झाले पाहिजे. यावर भर दिला. फुलेंनी बहुजन शिक्षणाच्या दृष्टीने आणखीन एक मूलभूत सिध्दांत हंटर कमिशन पुढे साक्ष देताना मांडला. फुलेंचा हा सिंध्दात मेकॉलेच्या वरून झिरपणारा सिध्दांताच्या (ध्पसजमतंजपवद जीमवतल) विरूध्द होता. तो असा की, शिक्षणाचा प्रसार खालून वर गेला पाहिजे. वरून खाली येता कामा नये.[१२]

अशाप्रकारे फुले यांनी शिक्षणासंबंधी विविध स्तरावरील वैशिष्टयपूर्ण भूमिका साकारलेली दिसते. फुलेंच्या पुढील कालखंडात न्या. रानडे, आगरकर, धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई, म. गांधी यांनी स्त्रीयांच्या सर्वांगीन विकासासाठी प्रयत्न केले पण ज्यावेळी स्त्रियाच्या हक्कासाठी, उद्धारासाठी त्याग करणाऱ्या आणि कष्ट भोगणाऱ्या जोतीराव फुले यांचा स्त्रियांचा उद्धारकर्ता म्हणून सत्कार झाला त्यावेळी न्या रानडे दहा वर्षाचे होते. विष्णुशास्त्री चिपळूणकर दोन वर्षाचे होते. गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे पंडिता, रमाबाई व म. गांधी यांचा जन्म ही झालेला नव्हता. या दृष्टीकोनातून बहुजन व स्त्री शिक्षणासंबंधीचा मुलभूत विचार मांडणारे व कार्य करणारे फुले हे पहिले भारतीय होते. फुलेंच्या पाउलखुणावरच छत्रपती शाहू, डॉ. आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या शैक्षणिक विचाराची बैठक तयार केली.

**संदर्भ सूची :**


१. श्री.एस.जी.तोडकर (संपा), *'इतिहास शिक्षक' (त्रैमासिक)*, ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २००४, पृ.क्र.५.
२. *भारतीय शिक्षण महामंडळाचे इतिवृत्त (१९६४–६६) शिक्षण व राष्ट्रीय विकास*, शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, पृ.क्र.९.
३. दिलीप चव्हाण, *'शिक्षण, शेती, आरक्षण'*, क्रांतीसिंह नाना पाटील अकादमी अहमदनगर १९९८, पृ.क्र.१
४. जी.एल.भिडे, एन.डी.पाटील, *'महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास' (१८१८–१९६०)* फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृ.क्र.७२.
५. ग.प्र.प्रधान (संपा), *'आगरकर लेख संग्रह'*, सागर डेपो, नवी दिल्ली, १९७१, पृ.क्र.१८०.
६. रा.तु.भगत, *'शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज'*, सिद्धराज प्रकाशन, पुणे–१९, पृ.क्र.२५–२७.
७. अशोक नाईकवाडे (सपां), *'आधारवड' कर्मवीर भाऊराव पाटील गौरव ग्रंथ*, दीपक प्रकाशन, औरंगाबाद. प्र.आ.डिसे.१९८७. पृ.क्र.१०१.
८. ज्ञानोदय १५ सप्टेबर १८५३.
९. हरि नरके (संपा), *'महात्मा फुले गौरव ग्रंथ'* डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र–साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन मुंबई सुधारित तृ.आ.२००६ पृ.क्र. १२९.
१०.नानाजी ठोंबरे, *'म.फुले यांचे शैक्षणिक कार्य'*, लोकवाङमय गृह मुंबई – १९९१, पृ.क्र.२८.
११.वसंत पळसीकर आणि मंडळ (सपां) *'नवभारत'* जे.पी.नाईक जन्म शताब्दी विशेषांक ऑगस्ट – सप्टेबर २००७ पृ.क्र.३५.
१२.*पुणे विद्यापीठ वार्ता* फेब्रुवारी २००० पृ.क्र.१०.




Scanned with CamScanner